आरोग्य सहाय्यक (महिला) गट-क संवर्गातील
कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व
नेमणूका करणेबाबत.
**(बिगर पेसा क्षेत्रातुन पेसा क्षेत्रात विनंती बदली)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/आस्था-५/२४४/२०२५
अहिल्यानगर दि.१६/०५/२०२५

वाचा - १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं. जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.जिपब-४१४/प्र.क्रं.११२/आस्था-१४,दि. ०२/०७/२०१४
३. ग्रामविकास विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दि.०२/०१/२०१७
४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं. जिपब-८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४ दि. ०७/०३/२०१९.
५. मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-३/१२२२/३३१/२०२५ दि.२६/०३/२०२५
६. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि. १५/०५/२०२५.

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, संदर्भ क्र.२ ते ४ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तदअनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, तसेच संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये बदल्या करण्यास दिलेल्या परवानगीनुसार जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागाच्या कार्यरत असलेल्या औषध निर्माण अधिकारी या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावा समोरील रकाना क्र.४ येथुन रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी विनंती बदलीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव व पदनाम | पदनाम | कार्यरत प्रा.आ.केंद्र तालुका | बदलीने पदस्थापना दिलेले प्रा.आ.केंद्र तालुका | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम सुनिता महादु लोहरे | आरोग्य सहाय्यक महिला | प्रा.आ.केंद्र देवठाण, ता.अकोले | पथक सातेवाडी प्रा.आ.केंद्र कोहणे, ता.अकोले | पेसा क्षेत्रात विनंती बदली |
| २ | श्रीम मिना काळू देशमुख | आरोग्य सहाय्यक महिला | प्रा.आ.केंद्र नेवासा खु.,ता.नेवासा | पथक कोकणवाडी प्रा.आ.केंद्र खिरविरे, ता.अकोले | पेसा क्षेत्रात विनंती बदली |
| ३ | श्रीम उर्मिला अरुण भवारी | आरोग्य सहाय्यक महिला | प्रा.आ.केंद्र तिसगाव, ता.पाथर्डी | प्रा.आ.केंद्र खिरविरे, ता.अकोले | पेसा क्षेत्रात विनंती बदली |

वरिल कर्मचा-यांचे बदलीची आदेश खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निर्गमित करण्यात येत आहेत.

१. आदेशात नमुद कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी दि.३१/०५/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.
२. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक ०१/०६/२०२५ नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या

पदावर रुजू न झाल्यास,अनुउपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल. तसेच मुद्दा क्र. ८ मध्ये नमुद केलेनुसार बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३. संबधित कार्यालय प्रमुख यांनी बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचेकडील कार्यभार सोपविणेबाबत पर्यायी व्यवस्था करुन संबंधितांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कार्यमुक्त करावे.

४. सदर बदली विनंतीने झाली असल्याने संबंधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202505191001 60 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,

आदेशात नमूद संबधीत आरोग्य सहाय्यक (महिला)
द्वारा संबधीत कार्यालय प्रमुखांमार्फत

प्रत – तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती ---------------

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन दि. ०१/०६/२०२५ नंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र ------------ ता.------------,जिल्हा अहिल्यानगर
प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रतः- निवड नस्ती

**(आशिष येरेकर भाप्रसे.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**